**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज गयानाकडून ‘द ऑर्डर ऑफ एक्सलन्स’ हा सर्वोच्च सन्मान प्रदान

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून देशाचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक म्हणून के. संजय मूर्ती यांना शपथ

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी ६५ टक्क्यांहून अधिक मतदान, १९९५ नंतर पहिल्यांदा एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदारांचा उत्साह

- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १० वी आणि १२ वीच्या परीक्षा ११ फेब्रुवारीपासून

**आणि**

- गोव्यात सुरू असलेल्या ५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात चित्रपट प्रेमींना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चित्रपटांची पर्वणी

<><><><><>

प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी यांना आज गयाना देशातला सर्वोच्च सन्मान ‘द ऑर्डर ऑफ एक्सलन्स’ प्रदान करण्यात आला. मोदी यांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व, जागतिक पातळीवर विकसनशील देशांच्या हक्कांना त्यांनी मिळवून दिलेलं व्यासपीठ, आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या समुदायासाठी त्यांचं उल्लेखनीय कार्य आणि भारत-गयाना देशांमधले संबंध अधिक दृढ करण्यासाठीची त्यांची कटिबद्धता आदींसाठी मोदी यांना या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. गयानाच्या स्टेट हाऊस मध्ये आज एका समारंभात गयानाचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद इरफान

अली यांच्या हस्ते मोदी यांना या पुरस्कारानं गौरवण्यात आलं. हा सन्मान दोन्ही देशातल्या नागरिकांमध्ये रुजलेल्या ऐतिहासिक संबंधांना समर्पित करत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. हा दौरा म्हणजे परस्पर देशातली मैत्री अधिक दृढ करण्याच्या भारताच्या कटिबध्दतेचा पुरावा असल्याचं ते म्हणाले. भारत-गयाना मधले संबंध सामायिक इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि उभय देशांचा परस्परांवरचा विश्वास यावर आधारित असल्याचं मोदी यांनी सांगितलं. भारत प्रत्येक क्षेत्रात गयाना ला बरोबरीनं साथ देण्यासाठी उत्सुक असून दोन्ही देशातले संबंध संपूर्ण सर्व विकसनशील देशांसाठी महत्वाचे असल्याचं मोदी यांनी यावेळी बोलताना अधोरेखित केलं.

<><><><>

भारत - अमेरिका संरक्षण भागीदारीमध्ये उभय देशांमध्ये वाढते सहकार्य, माहितीची देवाणघेवाण आणि औद्योगिक संशोधन यामध्ये अधिकाधिक प्रगती होत आहे, असा विश्वास केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि अमेरिकेचे संरक्षण सचिव लॉयड ऑस्टिन यांनी व्यक्त केला. ते आज लाओस मधल्या व्हीएनटीएन इथं झालेल्या ११ व्या आशियन संरक्षणमंत्रांच्या बैठकी दरम्यान बोलत होते. या बैठकी दरम्यान राजनाथ सिंह यांनी न्यूझिलंडचे संरक्षण मंत्री ज्युडिथ कॉलिन्स,दक्षिण कोरियाचे संरक्षण मंत्री किम योंग ह्युन यांची तसंच ऑस्ट्रेलियाचे संरक्षणमंत्री पॅट कॉनरॉय यांचीही भेट घेतली. राजनाथ सिंह यांनी न्यूझिलंडचे संरक्षण मंत्री ज्युडिथ कॉलिन्स यांना दोन्ही देशांमधील संरक्षण सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी आणि संरक्षण सहकार्य कराराला लवकर अंतिम रूप देण्याची विनंती केली.

<><><><>

देशानं गेल्या काही वर्षात निर्माण केलेल्या विश्वासामुळे भारत हा विकासाचं इंजिन ठरत आहे, असं प्रतिपादन वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी केलं.नवी दिल्ली इथं झालेल्या फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज अर्थात फिक्की च्या ९७ वाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एका सत्राला ते आज संबोधित करत होते. भारत आणि भारताचा व्यापार हा जागतिक मूल्य साखळीचा एक अग्रेसर भाग बनत आहे आणि जागतिक व्यापार सहकार्यामध्ये विश्वासू भागीदार ठरत आहे. सर्व उद्योग प्रतिनिधींनी नाविन्यपूर्ण आणि संशोधनास पूरक पर्यावरण विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहावं असं गोयल म्हणाले.

<><><><>

के. संजय मूर्ती यांनी आज सकाळी नवी दिल्ली इथं देशाचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आज, राष्ट्रपती भवन इथं पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. ऑगस्ट २०२० मध्ये CAG म्हणून नियुक्त झालेल्या गिरीश चंद्र मुर्मू यांच्या जागेवर मूर्ती यांची नियुक्ती झाली आहे. याआधी मूर्ती यांनी शिक्षण मंत्रालयात उच्च शिक्षण विभागाचे सचिव म्हणून काम केलं आहे.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन दिवसांच्या हैदराबाद दौऱ्यावर असून त्यांचं आज बेगमपेठ विमानतळावर आगमन झालं. तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवनाथ रेड्डी यांनी त्यांचं स्वागत केलं. राष्ट्रपती आता थोड्या वेळात हैदराबाद इथं आयोजित केलेल्या कोटि दीपोत्सवम मध्ये सहभागी होतील.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या २५ नोव्हेंबर रोजी जागतिक सहकार्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय संमेलनाचं उद्घघाटन होणार आहे. नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं होणारं हे संमेलन जगातलं पहिलंच संमेलन असून

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त प्रधानमंत्र्यांच्या हस्ते यावेळी एक टपाल तिकीटही प्रकाशित केलं जाणार आहे.

<><><><><>

शाश्वत आर्थिक विकास, वाढती क्रयशक्ती आणि गुंतवणुकीस अनुकूल वातावरण निर्माण करणाच्या उद्देशानं स्थिर चलनवाढ आवश्यक आहे. किंमत स्थिरतेमुळे बचत आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळते आणि अर्थव्यवस्था आणि जनता दोघांनाही लाभ होतो, असं प्रतिपादन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज ग्लोबल साऊथच्या उच्च स्तरीय बैठकीत केलं. विकास आणि चलनवाढ यांच्यातील समतोल साधण्यासाठी वित्तीय आणि आर्थिक समन्वय महत्त्वाचा आहे असंही शक्तिकांत दास यांनी सांगितलं.

<><><><><>

क्रीडा क्षेत्रात उच्च दर्जाच्या कामगिरीसाठी केंद्र सरकार लवकरच संसदेत क्रीडा विधेयक आणणार असल्याची माहिती युवक कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी दिली. ते आज पाटण्यात आयोजित एका कार्यक्रमात खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रातल्या व्यक्तींना संबोधित करत होते. देशाला क्रीडा क्षेत्रात सर्वोत्कृष्ट करण्यासाठी हे धोरण आखण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून आतापर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार राज्यात ६५ टक्क्यांहून अधिक मतदान झालं. निवडणूक आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार आज रात्रीपर्यंत मतदानाची अंतिम टक्केवारी हाती येईल. त्यानुसार या टक्केवारीत आणखी १-२ टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच राज्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदान झालंय. १९९५ च्या

विधानसभा निवडणुकीत ७१ पूर्णांक ६९ टक्के मतदारांनी मताधिकार बजावला होता.

राज्यात सर्वाधिक सव्वा ७६ टक्के मतदानाची नोंद कोल्हापूर जिल्ह्यात झाली. अहिल्यानगर, बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगोली, जालना, परभणी, सांगली, सातारा या जिल्ह्यांमध्येही ७० टक्क्यांपेक्षाही जास्त मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी ५२ टक्के मतदान मुंबई शहर या जिल्ह्यात नोंदवलं गेलं. मुंबई उपनगर जिल्ह्यात ५५ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. ठाण्यात ५६ टक्के मतदान झालं. हे ३ जिल्हे वगळता इतरत्र ६० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. मतदारसंघाचा विचार करता चिमूर आणि कागलमध्ये ८१ टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांनी मतदान केलं. राज्यातल्या २७ पेक्षा जास्त मतदारसंघात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी ४४ पूर्णांक ४९ टक्के मतदान कुलाबा मतदारसंघात झालं. अंबरनाथ, मुंबादेवी, धारावी आणि भिवंडी पूर्वमध्ये ५० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झालंय.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात काल ६८ टक्क्यांहून अधिक मतदान झालं. नाला मतदारसंघात ८० टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली. सर्व मतदान यंत्र स्ट्राँग रुम मध्ये ठेवली असून तिथे सीसीटीव्हीसह त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणा लावली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या बारावी आणि दहावीच्या परीक्षेचं अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलं आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा पुढच्या वर्षी ११ फेब्रुवारी ते १८ मार्च तर दहावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १७ मार्च या काळात घेतली जाणार आहे.

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या बोर्डाची परीक्षा १५ फेब्रुवारी पासून सुरु होणार असल्याची घोषणा आज सीबीएसईनं केली. दहावी बोर्डाच्या परीक्षा १८ मार्चला तर बारावीच्या परीक्षा ४ एप्रिल रोजी संपतील.

**<><><><><>**

इफ्फी अर्थात भारतीय चित्रपट महोत्सवातल्या चौथ्या क्रिएटिव्ह माइंड्स टुमारो कार्यक्रमाचं आज उद्घघाटन झालं. या कार्यक्रमाच्या माध्यमातून १३ प्रकारच्या चित्रपट निर्मिती क्षेत्रात काम करणाऱ्या १०० तरुण चित्रकर्मींची निवड करण्यात आल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजु यांनी यावेळी सांगितलं. याद्वारे तरुण चित्रपट निर्मितीच्या विविध क्षेत्रातलं आपलं कौशल्य जगासमोर आणतील. फिल्म बाजारच्या माध्यमातून त्यांच्यासाठी जागतिक स्तरावर काम करण्याची संधी मिळेल, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**//<><><><><>//**